# वाघ अभियांत्रिकीचे 'सहस्रांश' एसआयएचमध्ये तृतीय

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ११ : येथील के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अँन्ड रिसर्च येथील सहस्रांश संघाने स्मार्ट इंडिया हॅकथॉन (एचआयएच) २०२५ मध्ये यश मिळविले. या संघाने सायबर सुरक्षा शाखेतून तृतीय क्रमांक पटकावला.

केंद्र सरकारच्या नेतृत्वाखालील आणि इस्रोद्वारे आयोजित या राष्ट्रीय स्तरावरील सर्वांत मोठ्या नवोपक्रम उपक्रमात टीम सहस्रांशने उल्लेखनीय कामगिरी केली. या संघामध्ये केतन थोरात, प्रणव प्रजापती, आर्यन राय, पर्णिका पाटील, आविष्कार सोननी, अनुज देशमुख यांचा समावेश होता. त्यांना एचआयएच मार्गदर्शक प्रा. प्रिया राखिबे यांचे मार्गदर्शन लाभले. या




**नाशिक** : राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पारितोषिक विजेता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयातील सहस्रांश संघ.

वर्षी देशभरातून दोन हजारांहून अधिक संघांनी नावीन्यपूर्ण प्रकल्प सादर केले होते. संस्थेचा प्रकल्प पहिल्या काही निवडक प्रवेशांपैकी ठरला. केवळ पाच अंतिम संघांनी इस्रोत भाग घेतलेल्या महाअंतिम फेरीत प्रवेश केला.

अंतिम फेरीत नावीन्य, अंमलबजावणी आणि सायबर संरक्षण यावर लक्ष केंद्रित करून दोन दिवसांचा ३६ तासांचा हॅकथॉन आयोजित केला होता. या खडतर मूल्यमापनानंतर, टीम सहस्रांशने सायबर सुरक्षा शाखेत तिसरे पारितोषिक मिळवत राष्ट्रीय स्तरावर यश मिळविले आहे.

**Sakal 12-12-2025**